मल्याळम चित्रपटसृष्टीत महिलांचा छळ

न्या. हेमा समितीच्या अहवालातून माहिती उघड

कोची : मल्याळम चित्रपटसृष्टीत महिलांना लैंगिक अत्याचार आणि छळाचा सामना करावा लागतो, असे सोमवारी प्रसिद्ध झालेल्या न्यायमूर्ती हेमा समितीच्या अहवालात म्हटले आहे. मल्याळम चित्रपटसृष्टीतील अत्याचाराचे व्यापक स्वरूप या अहवालात अधोरेखित करण्यात आले आहे. चित्रपट उद्योगातील महिला व्यावसायिकांचा सुरक्षिततेबद्दल आणि कल्याणाविषयी चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

मल्याळ चित्रपटसृष्टीतील महिलांना भेडसावणाऱ्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी २०१९ मध्ये न्या. हेमा समिती स्थापित करण्यात आली होती. ''चित्रपटसृष्टीतील काही पुरुष, जे कलाकार, दिग्दर्शक आणि नामांकित व्यक्ती आहेत, त्यांनी चित्रपटसृष्टीतील काही महिलांचा लैंगिक छळ केलायचे पुराव्यानिशी समोर आले आहे,'' असे या अहवालात म्हटले आहे. अहवालाची प्रत सरकारला सादर केल्यानंतर पाच वर्षांनी माहिती अधिकार कायद्यांतर्गत प्रसारमाध्यमांना देण्यात आली.

पोर्कोव्हस्क शहर रिकामे करण्याचे आदेश

कीव : युक्रेनच्या स्थानिक प्रशासनाने सोमवारी पूर्वेकडील पोर्कोव्हस्क शहरात राहणाऱ्या कुटुंबीयांना जागा मोकळी करण्याचे आदेश दिले आहेत. या ठिकाणी लहान मुलांसह सुमारे ५३ हजार नागरिक राहत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. त्यांचे म्हणणे आहे, की रशियन सैन्याने कारवाईचा वेग वाढवला आहे. त्यामुळे येथील कुटुंबांना शहर आणि इतर जवळची ठिकाणे सोडणे अनिवार्य आहे. रशियन सैन्य गेल्या अनेक महिन्यांपासून पोर्कोव्हस्ककडे मार्गक्रमण करत आहे. याच पार्श्वभूमीवर स्थानिक प्रशासनाने पोर्कोव्हस्क शहर रिकामे करण्याच्या सूचना केल्या आहेत.

सिद्धरामय्या यांना न्यायालयाचा दिलासा

२९ ऑगस्टपर्यंत कारवाई न करण्याचे निर्देश

पीटीआय, बंगळूरु

लोकप्रतिनिधींसाठी असलेल्या खासदार-आमदार विशेष न्यायालयाने कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्याविरोधात २९ ऑगस्टपर्यंत कोणतीही कारवाई करू नये असे कर्नाटक उच्च न्यायालयाने सोमवारी स्पष्ट केले. 'मैसूरू नागरी विकास प्राधिकरण' (मुडा) घोटाळाप्रकरणी सिद्धरामय्या यांच्याविरोधात खटला चालवण्यास राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनी परवानगी दिली आहे. त्याच्या वैधतेला मुख्यमंत्र्यांनी उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करून आव्हान दिले.

सिद्धरामय्या यांच्या याचिकेवर न्या. एम नागप्रसन्ना यांच्यासमोर सुनावणी झाली. राज्यपाल गेहलोत यांनी १६ ऑगस्टला दिलेल्या परवानगीनुसार, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८च्या कलम १७अ अंतर्गत आणि भारतीय न्याय सुरक्षा संहितेच्या कलम २१८अंतर्गत मुख्यमंत्र्यांविरोधात खटला चालवता येणार आहे. मात्र, राज्यपालांचा हा निर्णय कायद्याच्या कसोटीवर न टिकणारा, प्रक्रियात्मकदृष्ट्या सदोष आणि बाह्य शक्तींनी प्रेरित असल्याचा आरोप सिद्धरामय्या यांनी केला आहे. ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी सिद्धरामय्या यांची तर महान्यायअभिकर्ता तुषार मेहता यांनी राज्यपालांची बाजू मांडली.

सिद्धरामय्या यांचे आक्षेप

राज्यपालांनी कोणताही सारासार विचार न करता खटला चालवण्यास परवानगी दिली आहे. तसेच वैधानिक आदेशाचे उल्लंघन करून आणि घटनात्मक तत्त्वांशी विसंगत आहे, असे आक्षेप सिद्धरामय्या यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिकेत घेण्यात आले आहेत. राज्यघटनेच्या अनुच्छेद १६३अंतर्गत मंत्रिमंडळाचा सल्ला घेणे बंधनकारक असताना त्याचे पालन झालेले नाही, असे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनाला आणून दिले आहे.



काँग्रेस, भाजपची निदर्शने

- सिद्धरामय्या यांच्या समर्थनार्थ काँग्रेस नेते व कार्यकर्त्यांनी तर त्यांच्या विरोधात भाजप कार्यकर्त्यांनी सोमवारी राज्यात निदर्शने केली. बंगळूरूमध्ये उपमुख्यमंत्री डी के शिवकुमार यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले.
- भाजपच्या कार्यकर्त्यांनी सिद्धरामय्या यांच्या राजीनाम्याची मागणी करत निदर्शने केली. प्रदेशप्रमुख बी वाय विजयेंद्र आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेते आर अशोक यांनी त्यांचे नेतृत्व केले.

यूपीएससी थेट प्रवेशावरून काँग्रेस आक्रमक

मागासवर्गीयांचे आरक्षण हिसकावून संघ विचारसरणीच्या लोकांची भरती- राहुल गांधी

पीटीआय, नवी दिल्ली

समस्तर प्रवेशाच्या (लॅटरल एन्ट्री) मुद्द्यावरून काँग्रेसने सोमवारी भाजपला लक्ष्य केले. यूपीएससी परीक्षा न देता मागच्या दारानेे अधिकाऱ्यांची भरती करण्याची ही पद्धत चुकीची आहे. केंद्र सरकार अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी, आर्थिक दुर्बलांचे आरक्षण हिसकावून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विचारसरणी असलेल्या लोकांची भरती करत आहेत, असा आरोप काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोमवारी केला.

केंद्रीय लोकसेवा आयोगाने (यूपीएससी) विविध मंत्रालयांमध्ये सहसचिव, संचालक आणि उपसचिव या दर्जाच्या ४५ पदांची समस्तर प्रवेशाद्वारे नियुक्ती करण्याची अधिसूचना जारी केली आहे. त्याला काँग्रेसने जोरदार विरोध केला आहे. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी असा दावा केला की, त्यांच्या पक्षाच्या नेतृत्वाखालील सरकारने त्यांच्या उपयुक्ततेनुसार काही विशिष्ट पदांवर निवडक तज्ज्ञांची नियुक्ती करण्यासाठी समस्तर प्रवेश प्रक्रिया सुरू केली होती. मात्र मोदी सरकारने दलित, आदिवासींचे अधिकार हिरावून घेण्यासाठी ही तरतूद केली आहे.

भाजप सरकारी विभागांमध्ये खासगी क्षेत्रातील लोकांची नियुक्ती करणार आहे, असा आरोप राहुल गांधी यांनी केला. समस्तर प्रवेश हा दलित, ओबीसी आणि आदिवासींवर हल्ला आहे. प्रशासकीय संरचना आणि सामाजिक न्याय या दोघांनाही हानी पोहोचवणाऱ्या या देशविरोधी पावलाचा इंडिया आघाडी जोरदार विरोध करेल, असे ते म्हणाले.

संकल्पना काँग्रेसच्या काळातीलच -केंद्र सरकार

समस्तर प्रवेशावरून काँग्रेसने केलेल्या आरोपांचे भाजप आणि केंद्र सरकार यांनी जोरदार खंडन केले. "समस्तर प्रवेशाची संकल्पना प्रथम काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूपीएच्या राजवटीत मांडण्यात आली होती. २००५ मध्ये स्थापन केलेल्या दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगाचे काँग्रेसने जोरदार समर्थन केले होते," असे केंद्र सरकारकडून सांगण्यात आले. माहिती व प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनीही काँग्रेसवर टीका केली. समस्तर प्रवेश संकल्पनेवर काँग्रेसची टीका ही त्यांची दांभिकता दर्शवते. भाजपच्या नेतृत्वाखालील रालोआ सरकारने यूपीए सरकारने विकसित केलेल्या संकल्पनेची अंमलबजावणी करण्यासाठी पारदर्शक पद्धत तयार केली आहे, असे वैष्णव म्हणाले.

१६ बाह्य, नऊ अंतर्गत जखमा, गळा दाबून मृत्यू

कोलकाता डॉक्टर अत्याचार प्रकरणातील शवविच्छेदन अहवालातील माहिती

एक्स्प्रेस वृत्तसेवा, कोलकाता

कोलकात्यातील आर. जी. कर वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील डॉक्टरच्या शवविच्छेदन अहवालातून अनेक धक्कादायक माहिती उघडकीस आली आहे. या तरुणीच्या शरीरावर १६ बाह्य आणि नऊ अंतर्गत जखमा आढळून आल्या आहेत. तिचा मृत्यू हाताने गळा दाबल्यामुळे झाला आहे, अशी माहिती शवविच्छेदन अहवालात आहे.

९ ऑगस्ट रोजी सोयाबीनचा ६.१० ते ७.१० या वेळेत शवविच्छेदन तपासणी करण्यात आली. त्यात असे नमूद करण्यात आले आहे की, पीडितेचा हाताने गळा दाबल्याने गुदमरून मृत्यू झाला आहे. मृत्यूचे कारण हत्या असून त्यापूर्वी तिच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याचे वैद्यकीय पुरावे आढळले आहेत.

या अहवालात शरीरावरील १६ बाह्य जखमांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. पीडितेचे गाल, ओठ, नाक, मान, हात आणि गुडघ्यावरील ओरखडे तसेच खासगी अवयवांना जखमा झालेल्या आहेत. मान, टाळू आणि इतर भागांच्या स्नायूंमध्ये नऊ अंतर्गत जखमा झाल्याचेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे. सर्व जखमा मृत्यूपूर्वीच्या आहेत, असेही नमूद केले आहे.

दरम्यान, या प्रकरणी कोलकातामधील वरिष्ठ डॉक्टरांनी पोलीस मुख्यालयावर मोर्चा नेला. वरिष्ठ डॉक्टर कुणाल सरकार आणि सुवर्णा गोस्वामी यांनी या मोर्चाचे नेतृत्व केले. डॉक्टर अत्याचारप्रकरणी समाजमाध्यमांवर शेअर केलेल्या पोस्टर्सदेखील दोघेही पोलिसांसमोर हजर झाले.

सर्वोच्च न्यायालयात आज सुनावणी

नवी दिल्ली : कोलकाता येथील डॉक्टर अत्याचार व हत्याप्रकरणी **आज, मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे.** **सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने या घटनेची दखल घेत मंगळवारी सकाळी १०.३० वाजता सुनावणीसाठी हे प्रकरण यादीत शीर्षस्थानी ठेवले आहे.**

'ममता यांना दोष देणाऱ्यांची बोटे तोडा'

बलात्कार व हत्या प्रकरणी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना दोष देणाऱ्यांची आणि त्यांच्या राजीनाम्याची मागणी करणाऱ्यांची बोटे तोडली जातील, असे वादग्रस्त विधान तृणमूल काँग्रेसचे ज्येष्ठ मंत्री उदयन गुहा यांनी केले आहे. "जे ममता बॅनर्जींवर हल्लाबोल करत आहेत, त्यांच्याकडे बोट दाखवत आहेत आणि त्यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहेत, ते कधीही यशस्वी होणार नाहीत. ममता बॅनर्जींकडे बोट दाखवणाऱ्यांची बोटे तोडली जातील," असे गुहा एका चित्रफितीमध्ये बोलताना दिसत आहेत.

माजी लष्करप्रमुख जनरल पद्मनाभन यांचे निधन

पीटीआय, चेन्नई

माजी लष्करप्रमुख जनरल सुंदरराजन पद्मनाभन यांचे चेन्नईतील राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८३ वर्षांचे होते. त्यांनी ३० सप्टेंबर २००० ते ३१ डिसेंबर २००२ या कालावधीत लष्करप्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळली होती.



जनरल पद्मनाभन यांनी दिल्लीतील प्रतिष्ठित नॅशनल डिफेन्स कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यापूर्वी तोफखाना ब्रिगेड आणि माउंटन ब्रिगेड यांचे नेतृत्व केले होते. त्यांनी १५ कोअर कमांडर म्हणून बजावलेल्या सेवेसाठी त्यांना अतिविशिष्ट सेवा पदकाने सन्मानित करण्यात आले. जनरल पद्मनाभन यांचा जन्म ५ डिसेंबर १९४० रोजी त्रिवेंद्रम येथे झाला. डेहरादूनमधील राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज (आरआयएमसी) आणि पुण्यातील नॅशनल डिफेन्स अॅकॅडमी (एनडीए) या लष्करी शैक्षणिक संस्थांचे ते विद्यार्थी होते. इंडियन मिलिटरी अॅकॅडमीमधून (आयएमए) शिक्षण पूर्ण केल्यानंतर ते १३ डिसेंबर १९५९ रोजी तोफखान्याच्या रेजिमेंटमध्ये अधिकारी म्हणून रुजू झाले. त्यांच्या कारकिर्दीमध्ये अनेक प्रतिष्ठित जबाबदाऱ्यांचा समावेश होता.

'वायनाडमधील आपत्तीग्रस्तांची कर्जे माफ करा!'

कोची : वायनाडमधील भूस्खलनग्रस्त आणि त्यातून बचावलेल्यांच्या खात्यांतून बँकांनी कर्जाचे मासिक हप्ते कापल्याबद्दल केरळ सरकारने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. बँकांनी ही कर्जे पूर्णपणे माफ करावी, कर्जमाफी केल्याने बँकांवर कोणताही अतिरिक्त भार पडणार नसल्याचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी सांगितले. आपत्तीग्रस्त या भागात शेती करत होते. पण आपत्तीमुळे येथील शेतजमिनीचा नकाशा पूर्णपणे बदलून गेल्याच्या मुद्द्याकडे विजयन यांनी लक्ष वेधले.

उत्तर प्रदेशात डॉक्टरचा परिचारिकेवर बलात्कार

मोरादाबाद : कोलकात्यातील प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टर बलात्कार आणि हत्या प्रकरण ताजेच असताना, एका दलित परिचारिकेला खासगी रुग्णालयात ओलीस ठेवून तिच्यावर डॉक्टरांनी बलात्कार केल्याची घटना उत्तर प्रदेशमधील मोरादाबादमध्ये रविवारी रात्री घडली. पीडितेच्या वडिलांनी याप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. याप्रकरणी तिघांना अटक केल्याची माहिती पोलिसांनी दिली. मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. कुलदीप सिंग यांच्या सूचनेनुसार रविवारी सायंकाळी आरोग्य विभागाच्या पथकाने तपासणी केल्यानंतर रुग्णालय सील करण्यात आले. पुढील तपास सुरू असल्याचे पोलीस अधीक्षक मीना यांनी सांगितले.

MCXCCL
मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: एक्स्चेंज स्क्वेअर, सीटीएस २५१, सुर्ले रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३
ई-मेल: ig-mcxccl@mcxccl.com | संकेतस्थळ: https://www.mcxccl.com | दूरध्वनी: +९१-२२-६८६४ ६०००
सी आय एन: U74999MH2008PLC185349

सोळाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

याद्वारा सूचित करण्यात येते की, कंपनीची सोळावी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) दिनांकित २६ जुलै २०२४ च्या एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार कामकाजावर विचारविनिमय करण्यासाठी व्हिडीओ कॉन्फरन्सिंग ("VC") / इतर दृक् श्राव्य माध्यम ("OAVM") द्वारा गुरुवार, १२ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी ४.०० वाजता घेण्यात येणार आहे. कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार एजीएम VC / OAVM द्वारा आयोजित केली जाईल.

उल्लेखित परिपत्रकांच्या अनुसार, एजीएम नोटीस आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी वार्षिक अहवालासह १९ ऑगस्ट २०२४ रोजी सर्व सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने कंपनीकडे नोंदणी केलेल्या ईमेल पत्त्यांवर पाठविण्यात आली आहे. एजीएम सूचना कंपनी वेबसाइट https://www.mcxccl.com/disclosures/announcement वर उपलब्ध आहे आणि वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाइट https://www.mcxccl.com/disclosures/financial-results वर उपलब्ध आहे. एजीएममध्ये उपस्थित राहण्याच्या सूचना या एजीएम नोटिसमध्ये दिल्या आहेत.

एजीएममध्ये व्यवहार करण्याच्या व्यवसायाच्या कामकाजासंबंधित कागदपत्रे बैठकीच्या तारखेपर्यंत तपासणीसाठी उपलब्ध असतील.

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
ठिकाण: मुंबई **मंदार कुलकर्णी**
दिनांक: १९ ऑगस्ट २०२४ **कंपनी सचिव**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
म.रा.रा.वि.म.
के. सी. मार्ग, वांद्रे (पश्चिम), मुंबई - ४०००५० संकेतस्थळ : www.msrdc.in ई-मेल : msrdc_pune@msrdc.in
CIN-U45200MH1996SGC101586

ई-निविदा सूचना - २

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, के.सी.मार्ग, वांद्रे (पश्चिम), मुंबई ४०० ०५० खाली नमूद केल्यानुसार भारतीय पुरातत्व विभाग, राज्य पुरातत्व विभाग यांचे तालिकेवरील किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील उपरोक्त कामांच्या अनुभवी नोंदणीकृत कंत्राटदारांकडून / संस्था / व्यक्तींकडून खालील कामांकरिता बी-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) मागविल आहे. निविदा संच **https://mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर दि. १९/०८/२०२४ (दु. ०३:०० वा) ते २६/०८/२०२४ (दु. ०३:०० वा) पर्यंत उपलब्ध राहील.

अ. क्र.	कामाचे वर्णन	कामाची किंमत (जीएसटी वगळून)	कोरी निविदा नमुना (विना परतावा)	इसारा रक्कम
१	खिद्रापुर, ता. शिरोळ, जि. कोल्हापुर, कोपेश्वर मंदिराचे जतन, संवर्धन व परिसर विकास करणे अंतर्गत कृष्णा नदी लगत दगडी घाट इ. कामांचे बांधकाम करणे.	रु. ११,७८,५५,८९८/- (रुपये अकरा कोटी अठ्ठ्याहत्तर लाख पंचावन्न हजार आठशे अठ्ठ्याण्णव फक्त)	रु १५,०००/- + GST	रु. ५,९०,०००/- (रुपये पाच लाख नव्वद हजार फक्त)
२	कार्ला, ता. मावळ, जि. पुणे येथील आई एकवीरा मंदिराचे जतन, संवर्धन व परिसर विकास करणे अंतर्गत मंदिराचे जतन संवर्धन व मंदिर परिसरातील दुरुस्ती व इतर कामांचे बांधकाम करणे.	रु. १३,४४,६९,७५५/- (रुपये तेरा कोटी चौवेचाळीस लाख एकोणसत्तर हजार सातशे पंचावन्न फक्त)	रु १५,०००/- + GST	रु. ६,७३,०००/- (रुपये सहा लाख त्र्याहत्तर हजार फक्त)

ई-निविदा उपलब्ध कालावधी	दि. १९/०८/२०२४ (दु. ०३:०० वा) ते २६/०८/२०२४ (दु. ०३:०० वा)
संकेतस्थळावर ई-निविदा भरण्याचा कालावधी	दि. १९/०८/२०२४ (दु. ०३:०० वा) ते २६/०८/२०२४ (दु. ०३:०० वा)
निविदा पूर्व चर्चा बैठक दिनांक व वेळ	दि. २२/०८/२०२४ वेळ :- दुपारी ३.०० वाजता. कार्यालय – मुख्य अभियंता, मरारवि महामंडळ, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे.
भरलेली निविदा प्रत (Hard Copy) जमा करण्याची तारीख	दि. २९/०८/२०२४, सायंकाळी ०१.०० वाजेपर्यंत. अधीक्षक अभियंता, मरारविम, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे – ४११ ००१. फो.न. ०२०-२६०५१७७१.
ई-निविदा तांत्रिक लिफाफा उघडण्याची तारीख	दि. २९/०८/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता

उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
म.रा.र.वि.म. (मर्या.), मुंबई

बँक ऑफ इंडिया BOI
Bank of India
मुख्य कार्यालय
ट्रान्झॅक्शन मॉनिटरिंग आणि केवायसी/एमएल विभाग

शुद्धिपत्र

आमच्या फील्ड अधिकाऱ्यांसाठी फीडबॅक अभ्यासासाठी खुल्या निविदा आमंत्रित करण्यासाठी जारी केलेल्या जाहिरातीचे शुद्धीपत्र. दि. ७ ऑगस्ट 2024 रोजी बिझनेस स्टँडर्ड – मुंबई (इंग्रजी), बिझनेस स्टँडर्ड (हिंदी), लोकसत्ता (मराठी) मध्ये प्रकाशित झालेल्या जाहिरातीमध्ये खालील शुद्धिपत्रक जारी करत आहे.

बोली सादर करण्याची अंतिम तारीख आता 02.09.2024 पर्यंत वाढवण्यात आली आहे. खंड क्रमांक 3.25 (बिड प्रोसेसिंग फी) नॉन–रिफंडेबल मध्ये, "बिड प्रोसेसिंग फी, नॉन–रिफंडेबल" हा शब्द "अनैस्ट मनी डिपॉझिट, रिफण्डेबल" म्हणून वाचण्यात यावा. अधिक माहितीसाठी कृपया बँक ऑफ इंडियाच्या अधिकृत वेबसाइटला भेट द्या.

पुढील बदल, जर काही असतील तर, ते फक्त बँकेच्या वेबसाइटवर प्रकाशित केले जातील. अधिक तपशीलांसाठी कृपया बँक ऑफ इंडियाच्या अधिकृत वेबसाइट www.bankofindia.co.in वर BOI>Important Links>Tender ला भेट द्या.

icmr NITVAR
आईसीएमआर–राष्ट्रीय ट्रांसलेशनल वायरॉलॉजी एवं एड्स अनुसंधान संस्थान, पुणे
पूर्व आईसीएमआर–राष्ट्रीय एड्स अनुसंधान संस्थान, पुणे
स्वास्थ्य अनुसंधान विभाग,
स्वास्थ्य एवं परिवार कल्याण मंत्रालय, भारत सरकार
ICMR-National Institute of Translational Virology & Aids Research (ICMR-NITVAR), Pune
Formerly ICMR-National Aids Research Institute, (ICMR-NARI)
Department of Health Research,
Ministry of Health and Family Welfare, Government of India

भर्ती की अधिसूचना | RECRUITMENT NOTIFICATION
संस्था–आईसीएमआर–नितावर / डिआर / प्रशासन / 01 / 2024-25
Advertisement No.: ICMR-NITVAR/DR/ADMN./01/2024

आईसीएमआर–नितावर, पुणे में सीधी भर्ती के तहत निम्नलिखित पदों के लिए पात्र उम्मीदवारों से ऑनलाइन आवेदन आमंत्रित किए जाते हैं।
Online applications are invited from eligible candidates for the following positions under the Direct Recruitment at ICMR-NITVAR, Pune.

अ. क्र Sr. No.	पद का नाम Name of the post	पदों की कुल संख्या Total No. of Posts	अनारक्षित Unreserved	आरक्षण Reservation ओबीसी OBC	आरक्षण Reservation ईडब्लूएस EWS	वेतन स्तर (सातवें सीपीसी के अनुसार) Pay Level (as per 7th CPC)
1	प्रवर श्रेणी लिपिक Upper Division Clerk	03	03	0	0	वेतन स्तर Pay Level-4 (₹25500 - 81100)
2	अवर श्रेणी लिपिक Lower Division Clerk	05	02	02	01	वेतन स्तर Pay Level-2 (₹19900 - 63200)
	कुल TOTAL	08	05	02	01	

विस्तृत भर्ती की अधिसूचना को ऑनलाइन पंजीकरण के साथ उचित समय पर आईसीएमआर और आईसीएमआर–नितावर वेबसाइटों (https://main.icmr.nic.in/ and https://www.nari-icmr.res.in/) पर प्रकाशित और अपलोड की जाती है। आवेदन लिंक के अधिसूचना में यदि कोई परिवर्तन होता है, तो इसे उपरोक्त वेबसाइटों पर शुध्दिपत्र/परिशिष्ट के रुप में प्रकाशित किया जाएगा।
The detailed recruitment notification is published and uploaded on ICMR and ICMR-NITVAR websites **(https://main.icmr.nic.in/ and https://www.nari-icmr.res.in/)** along with online registration/ application link. If there are any changes in the notification, corrigendum/addendum will be published to that effect, on the above websites.

निदेशक
DIRECTOR

Organized by IDEMI Mumbai, Ministry of MSME, Govt. of India
Government Certificate Course On HOSPITAL MANAGEMENT
Course duration : 4 days
Course Timing
Time-2 PM to 4 PM
(ONLINE)
Course Dates: 24,25,31,August 1 September 2024
Email: training@idemi.org
Website: www.idemi.org
Technical Details - 8470090975
QR Code for Registration and Payment
Regular Fees -2500/- +18% GST
Student Fees- 1500/- +18 % GST
For whom-Student from all kind of Nursing college and medical college
After completion Government certificate will be issued.
Call for details between 10 am to 6pm
Contact-9270076724,9403566219 ,8007765693, 9869087617

निविदा सूचना

"गिरिविहार सीएचएस. लि.'या, वसई रोड (पश्चिम) पुनर्विकासाकरिता नामांकित विकासकांकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात आल्या आहेत. सोसायटीसमवेत अधिहस्तांतरण विलेखानुसार ७/१२या प्लॉट एरिया २००६.७२ चौ.मी. आहे, निविदा कागदपत्रे २०.०८.२०२४ **पासून ते २८.०८.२०२४ पर्यंत स. ११.०० व सायं. ०६.०० दरम्यान "देवेंद्र मिस्त्री अॅण्ड असोसिएट्स"**च्या नावे रोख/डी.डी.द्वारा रु. २०,०००/- (ना-परतावा) च्या प्रदानावर पीएमसी कार्यालयात उपलब्ध आहेत.

निविदेच्या सादरीकरणाची रोखटची तारीख १४.०९.२०२४ रोजी पीएमसी कार्यालयात **स. ११.०० व सायं. ०६.०० दरम्यान आहे. जर** दिनांक १४.०९.२०२४ पर्यंत ३ निविदाकारांद्वारा ठेय भरली न गेल्यास, उपलब्धता च सादरीकरणाची तारीख पहिल्या **७ दिवसांकरिता** किंवा आवश्यकतेनुसार त्याहून अधिक दिवसांकरिता विस्तारित करण्यात येणार आहे. "सोसायटी" त्याकरिता कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व निविदा नामंजूर करण्याचा हक्क राखून ठेवीत आहे.

पीएमसी कार्यालयाचा पत्ता : मेसर्स देवेंद्र मिस्त्री अॅण्ड असोसिएट्स, बी/१०८, रेती पॅलेस, गुरुनानकनगर, जैन टेम्पलसमोर, अंबाडी रोड, वसई (प.), पालघर-४०१२०२. संपर्क : ९६७७४८७७४/९८२३२४४३६०.

सोसायटी पत्ता : गिरिविहार सीएचएस. लि., स्टेशनजवळ, आनंदनगर, विश्वकर्मा हॉलजवळ, वसई (प.), पालघर-४०१२०२, संपर्क : ९२२३३९९७०८.

बृहन्मुंबई महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग
जाहिरात
क्र. एमपीआर/७८१४ दि. १४.०८.२०२४

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध खात्याच्या आस्थापनेवरील गट 'क'मधील रु. २५,५००-८१,१०० (Pay Matrix-M15) अधिक अनुज्ञेय भत्ते या सुधारित वेतनश्रेणीतील "कार्यकारी सहायक" (पूर्वीचे पदनाम : लिपिक) या संवर्गातील खालील तक्त्यात नमूद केलेली १८४६ रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी, सदर पदासाठी आवश्यक असलेली अर्हता/पात्रता धारण करीत असलेल्या पात्र व इच्छुक उमेदवारांकडून ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/for prospects/Careers-All/Recruitment/Chief Personnel Officer या संकेतस्थळावर सदरची संपूर्ण जाहिरात, अटी व शर्तीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर जाहिरात दि. २०.०८.२०२४ ते दि. ०९.०९.२०२४ या कालावधीकरिता संकेतस्थळावर उपलब्ध राहील. संकेतस्थळावरील जाहिरातीस अनुसरुन सदर पदासाठीची विहित अर्हता व अटींची पूर्तता करणाऱ्या पात्र व इच्छुक उमेदवारांनी वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर भेट देऊन, जाहिरातीसोबत जोडलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन, विहित नमुन्यातील ऑनलाइन अर्ज, ऑनलाइन पद्धतीने, विहित वेळेत सादर करावा. उमेदवाराने संपूर्ण अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रिंट काढून स्वत:जवळ ठेवावी. उमेदवारांच्या मार्गदर्शनार्थ कॉलसेंटर, प्रसाधनगृही क्रमांक : ९५१२३२५३२३३ सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.०० या वेळेत (दुपारी १.३० ते २.३० जेवणाची वेळ), सोमवार ते शनिवार उपलब्ध असेल.

पदाचे नाव :	"कार्यकारी सहायक" (पूर्वीचे पदनाम : लिपिक)
वेतनश्रेणी (सुधारित) :-	स्तर-M15- रु. २५,५००-८१,१००
भरावयाच्या रिक्त पदांची संख्या :-	१८४६
गट :-	'क'

उपलब्ध रिक्त पदांचा तसेच सामाजिक व समांतर आरक्षणाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(१) सामाजिक आरक्षणांतर्गत भरावयाची रिक्त पदे

तपशील	अजा	अज	विजा (अ)	भज (ब)	भज (क)	भज (ड)	विमाप्र	इमाव	आ.दु.घ.	सा.शै.मा.व.	खुला/ अनाथ	एकूण
भरावयाची पदे	१४२	१५०	४९	५४	३९	३८	४६	४५२	१८५	१८५	५०६	१८४६

(२) समांतर आरक्षणांतर्गत भरावयाची पदे

समांतर आरक्षण	अजा	अज	विजा (अ)	भज (ब)	भज (क)	भज (ड)	विमाप्र	इमाव	आ.दु.घ.	सा.शै.मा.व.	खुला	एकूण
सर्वसाधारण	४७	४८	१७	१८	१२	१२	१५	१४८	६०	६०	१६७	६०४
महिला ३०%	४३	४५	१५	१६	१२	११	१४	१३६	५६	५६	१५२	५५६
माजी सैनिक १५%	२१	२३	७	८	६	६	७	६८	२८	२८	७६	२७८
प्रकल्पग्रस्त ५%	७	८	२	३	२	२	२	२३	९	९	२५	९२
भूकंपग्रस्त २%	३	३	१	१	१	१	१	९	४	४	१०	३८
खेळाडू ५%	७	८	२	३	२	२	२	२३	९	९	२५	९२
अंशकालीन पदधीधर (सुशिक्षित बेरोजगार) १%	१४	१५	५	५	४	४	५	४५	१९	१९	५१	१८६
एकूण	१४२	१५०*	४९	५४	३९	३८	४६*	४५२	१८५	१८५	५०६	१८४६
अनाथ मुलांसाठी (१%)	१८ पदे अरक्षित होत आहेत. परिपत्रक क्र. एमबीसी/९४७६ दि. २६.०४.२०२३ सोबतचा महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. अनाथ-२०२१/प्र.क्र.१२२/का-०३ दि. ०६.०४.२०२३ अन्वये प्राप्त निर्देशानुसार, १८ पदांपैकी **संस्थात्मक प्रवर्गाकरिता- ०९ पदे व संस्थाबाह्य प्रवर्गाकरिता- ०९ पदे आरक्षित होत आहेत.**											
दिव्यांगांसाठी (४%)	७३.८४ = पूर्णांकात ७४ पदे आरक्षित होत आहेत (अ-१९, ब-१९, क-१८, ड/ई-१८).											

* अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात आलेली कार्यकारी सहाय्यक (पूर्वीचे पदनाम : लिपिक) व त